**पोलीस अधीक्षक,कार्यालय, उस्मानाबाद.**

**" प्रेस नोट "**

**वार :- शुक्रवार**

**दिनांक :- ०९/११/२०१८**

---

**" मौजे सारोळ (बु ) येथे महिलेचा विनयभंग गुन्हा दाखल "**

पोलीस ठाणे उस्मानाबाद (ग्रामीण) :- दिनांक ०८/११/२०१८ रोजी मौजे सारोळा (बु) येथील परमेश्वर शिवाजी माने रा. सारोळा बु. ता.जि.उस्मानाबाद याने फिर्यादीस घराचे बाहेर बोलावुन तिस अश्लिल भाषेत लज्जास्पद बोलुन तिस लज्जा वाटेल असे कृत्य करुन तिचा विनयभंग केला वरुन पो.स्टे. उस्मानाबाद ( ग्रामीण ) येथे इसम नामे परमेश्वर शिवाजी माने रा. सारोळा (बु) यांचे विरुध्द कलम ३५४ (अ), ५०९,५०४ भा.द.वि प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोहेकॉ राठोड हे करीत आहेत.

**" मौजे परतापूर ता.कळंब येथे एकास मारहाण केले वरुन गुन्हा "**

पोलीस ठाणे येरमाळा :- दिनांक ०७/११/२०१८ रोजी २०.३० वा.सुमारास मौजे परतापूर येथे फिर्यादी नामे बाजीराव रोहिदास गायकवाड रा. परतापूर ता. कंळब यास मौजे परतापूर येथील इसम नामे १) विकास बाजीराव गायकवाड २) किसकिंदा बाजीराव गायकवाड यांनी फिर्यादीस भाकरी मागीलेचे कारणावरुन तुला कुठली भाकरी दयायची असे फिर्यादीने म्हणाले असता नमुद इसमाने फिर्यादीस शिवीगाळ करुन लाथाबुक्याने मारहाण करुन विकास बाजीराव गायकवाड याने फिर्यादीचे हातावर, तोंडावर मारुन फिर्यादीचे डावे हाताचे हाड मोडुन गंभीर दुखापत करुन जिवे मारण्याची धकमी दिले वरुन वरील नमुद इसमा विरुध्द पो.स्टे. येरमाळा येथे कलम ३२५,३२४,३२३,५०४,५०६,३४ भा.द.वि प्रमाणे गुन्हयाची नोंद असुन तपास सपोफौ जाधव हे करीत आहेत.

**" मौजे ताकविकी येथे एकास मारहाण केलेवरुन गुन्हा "**

पोलीस ठाणे बेंबळी :- दिनांक ०७/११/२०१८ रोजी २२.३० वाजण्याचे सुमारास मौजे ताकविकी येथे फिर्यादी नामे तजमुनबी गणी शेख रा. ताकविकी ता.जि.उस्मानाबाद ही तचे घरी असताना मौजे ताकविकी येथील इसम नामे शिवलाल यादव यांनी तु माझे भावाची घेतलेली बोरची मोटर आत्ताचे आत्ता परत दे या कारणावरुन फिर्यादीस शिवीगाळ करुन हातात विट घेवुन फिर्यादीचे डोक्यात मारुन जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिले वरुन पो.स्टे. बेंबळी येथे इसम नामे शिवलाल यादव रा. ताकविकी ता.जि. उस्मानाबाद यांचे विरुध्द कलम ३२४,५०४,५०६ भा.द.वि प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास सपोफौ हजारे हे करीत आहेत.

Scanned by CamScanner

**" मौजे किलज  येथे एकास मारहाण केलेवरुन गुन्हा "**

पोलीस ठाणे नळदुर्ग  :- दिनांक ०८/११/२०१८ रोजी  १६.०० वाजण्याचे सुमारास मौजे किलज येथील फिर्यादी नामे रघुनाथ राम भोईटे हे आपले शेतात असताना इसम नामे १) बलभिम सुभाष भोईट २) अविनाश सुभाष भोईटे ३) विकास सुभाष भोईटे ४) सुभाष यशवंत भोईटे सर्व रा. किलज यांना फिर्यादीने तुम्ही तुमचे बैल नेहमीच माझे शेतात का लावता असे विचारले असता नमुद इसमांन फिर्यादीस संगणमत करुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन फिर्यादीचे डाव्या कानाचे पाठीमागे दगड मारुन जखमी केले वरुन पो.स्टे. नळदुर्ग येथे वरील इसमा विरुध्द कलम ३२४,३२३,५०४,३४  भा.द.वि प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास पोहेकॉ लोमटे हे करीत आहेत.

**" मौजे सांजा  येथे एकास मारहाण केलेवरुन गुन्हा "**

पोलीस ठाणे आनंद नगर  :- दिनांक ०८/११/२०१८ रोजी  १९.०० वाजण्याचे सुमारास सांजा ते सारोळा जाणारे रोडवर जोगेश्वरी ढाब्या जवळ फिर्यादी नामे सुमित प्रदिप शिंदे रा. सरोळा बु यांना मौजे सारोळा येथील इसम नामे १) कुंदन भिमराव शिंदे २) रामकृष्ण भिमराव शिंदे ऊर्फ पवन भैय्या दोघे रा. सारोळा यांनी संगणमत करुन फिर्यादीस मागील झालेल्या तक्रारीची कुरापत काढुन फिर्यादीस तु लय माजलास का असे म्हणुन त्यांचे जवळील चावीचे किचनला असणाऱ्या लहान चाकुने फिर्यादीचे डाव्या हाताचे दंडावर मारुन जखमी केले व पाठीवर, डोकीत बुक्यांनी मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी कदले वरुन नमुद इसमा विरुध्द पो.स्टे. आनंद नगर येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भा.द.वि प्रमाणे  गुन्हा दाखल असुन तपास पोहेकॉ कदम हे करीत आहेत.

**" मौजे डकवाडी ता.उस्मानाबाद येथे मोटार सायकलला कट मारण्याचे कारणावरुन मारहाण केलेल्या व्यक्ती विरुध्द गुन्हा "**

**पोलीस ठाणे ढोकी** :- दिनांक ०८/११/२०१८ रोजी १६.०० ते १६.३० वा.सुमारास मौजे डकवाडी येथील बस स्टॅप येथे फिर्यादी नामे रामेश्वर हणुमंत पुनगडे रा. डकवाडी ता.जि उस्मानाबाद यास मौजे कोळेवाडी येथील  इसम नामे  १) रंणजित जरीचंद कांबळे २) बजरंग आकोसकर ३) प्रकाश खोत ४) रुषीकेश आकोसकर ५) आरुण कांबळे ६) लाला आकोसकर ७) दयानंद आकोसकर ८) संतोष पोपट आकोसकर सर्व रा. कोळेवाडी ता.जि.उस्मानाबाद यांनी मोटार सायकलला कट मारण्याचे कारणावरुन गैर कायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीस शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी व काठीने मारहाण करुन पायावर गाडी घालुन जखमी केले वरुन पो.स्टे. ढोकी येथे वरील नमुद इसमा विरुध्द कलम १४३, १४७ ,१४८ ,१४९, ३२४, ३२३,३३६,३३७,५०४,५०६ भा.द.वि प्रमाणे गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन तपास पोहेकॉ प्रकाश राठोड  हे करीत आहेत.

Scanned by CamScanner

**" मौजे आसु येथे ता. परंडा येथे दारु अडयावर छापा "**

पोलीस ठाणे परंडा :- दिनांक ०८/११/२०१८ रोजी १५.२० वाजता मौजे आसु ता.परंडा येथील स्त्री नामे सुमन दिगंबर पवार रा. आसु ही तिचे राहते घरी विनापास परवाना बेकायदेशीर रित्या देशी / गा.ह.भ ची दारु जवळ बाळगुन तिचा चोरटा विक्री व्यवसाय करीत असताना मिळुन आली वरुन पो.स्टे. परंडा येथील पोलीसांनी छापा मारुन एकुण २,८६०/- रु चा माल मिळुन आल्याने पो.स्टे. परंडा येथे कलम ६५ (ई) मुंबई दारुबंदी कायदया प्रमाणे पोलीस नाईक सुरवसे यांचे फिर्यादी वरुन गुन्हा नोंद असुन तपास पोहेकॉ काझी हे करत आहेत.

पोलीस निरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी,
उस्मानाबाद.

**टिप :- वर नमुद दाखल गुन्हयांचे अनुषंगाने ज्या नागरिकांना त्यांचेकडे तपासास उपयुक्त अशी माहिती असेल त्यांनी संबंधीत पो.स्टे.चे प्रभारी अधिकारी यांना सदरची माहिती पुरवुन तपासकामी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.**

Scanned by CamScanner